सुविचार
नैतिक मूल्ये आणि संस्कार हीच आपली खरी ओळख आहे.

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com



उघडे डीपी बॉक्स आणि केबल नागरिकांच्या मुळावर
पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 137 ■ गुरुवार, दि. 26 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5

# सोयाबीनसाठी हेक्टरी ११६० रूपयांचा हप्ता

## एक रूपयांत पीक विमा योजना बंद केल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भूर्दंड

### मदतीचे निकष बदलल्यामुळे शेतकऱ्यांना बसणार फटका

आरंभ मराठी | धाराशिव

राज्य शासनाने एक रुपयात पीक विमा योजना बंद करून नव्याने सुधारित पिक विमा योजना जाहीर केली आहे. त्यासंबंधीचा शासन निर्णय मंगळवारी (दि.२४) महाराष्ट्र शासनाच्या कृषी व पशुसंवर्धन विभागाने काढला. नव्या पीक विमा योजनेत शेतकऱ्यांकडून सोयाबीन पिकासाठी हेक्टरी ११६० रुपये रक्कम वसूल करण्यात येणार आहे. ही रक्कम पहिल्यापेक्षा १०० रुपये अधिक असल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. एक रुपयात पीक विमा योजनेत मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळे झाल्यामुळे राज्य सरकारने नवीन पीक विमा योजना आणली आहे. या नव्या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ पीक कापणी प्रयोगा आधारेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. त्यामुळे विविध टप्प्यावर झालेल्या शेती पिकाच्या नुकसानी पासून शेतकरी वंचित राहणार आहेत. अग्रीम मदत नव्या योजनेत समाविष्ट नसल्यामुळे सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात पडणाऱ्या अतिवृष्टीम ुळे पिकांचे जे नुकसान होणार आहे त्याला अग्रीम मदत मिळणार नाही. ही योजना ८० -११० मॉडेल नुसारच राबवली जाणार आहे. याला केंद्र शासनानेही मान्यता दिली आहे. सुधारित योजना खरीप आणि रब्बी हंगामासाठी असणार आहे. वेगवेगळ्या जिल्ह्यासाठी वेगवेगळ्या पिक विमा कंपन्या राहणार असून, धाराशिव जिल्ह्यासाठी आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी नियुक्त करण्यात आलेली आहे. यावर्षीच्या पिक विमा योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या जिल्ह्यासाठी पीक विमा संरक्षण करण्याचे हप्ते वेगवेगळे राहणार आहेत. यापूर्वीच्या पिक विमा योजनेत विविध चार कव्हर अंतर्गत नुकसान भरपाई दिली जात होती. त्यात प्रामुख्याने पेरणी, कापणी यशस्वी झाल्यास शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत होती. तसेच हंगाम ातील प्रतिकूल परिस्थिती, स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणीनंतरचे नुकसान या चार कव्हर अंतर्गत नुकसान भरपाई दिली जात होती. आता हे सर्व रद्द करून केवळ पीक कापणी प्रयोगा आधारे नुकसान भरपाई दिली जाणार आहे.



### सोयाबीन पिकासाठी हेक्टरी ११६० रुपये विमा हप्ता भरावा लागणार

यावर्षी धाराशिव जिल्ह्याची सोयाबीनची प्रती हेक्टर संरक्षित रक्कम ५८ हजार इतकी आहे. संरक्षित विमा हप्ता एकूण रकमेच्या ६.१४ इतका आहे. यात शेतकऱ्याला दोन टक्के केंद्र व राज्य शासनाला २.७% रक्कम प्रत्येकी भरावयाची आहे. शेतकऱ्याला प्रतिहेक्टर सोयाबीन पीक संरक्षित करण्यासाठी ११६० रुपये भरावे लागतील. १२०० रुपये केंद्र शासन व १२०० रुपये राज्य शासन असे एकूण मिळून ३५६१ रुपये प्रति हेक्टरचा हप्ता पिक विमा कंपनीला दिला जाईल. यापूर्वी हा हप्ता १० हजार ७८० रुपये इतका होता. खरीप हंगामाचा पिक विमा भरण्याची अंतिम दिनांक ३१ जुलै अशी आहे. १ जुलैपासून पिक विमा भरण्यास सुरुवात होईल.

### ॲग्रीस्टॅक आणि ई-पीक पाहणी बंधनकारक


नवीन पीक विमा योजनेत शेतकऱ्याची ॲग्रीस्टॅक मध्ये नोंदणी असणे आवश्यक आहे. तसेच पीक विमा काढलेल्या पिकाची ई-पीक पाहणी असणे देखील बंधनकारक करण्यात आले आहे.

### बोगस विमा काढल्यास ५ वर्षे बंदी

कागदपत्रात फेरफार करून तसेच इतर अवैध मार्गाने पीक विम्याचा लाभ घेतल्यास त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करून पीक विमा योजनेतून पाच वर्षांसाठी बाद करण्यात येणार असल्याचा निर्णय कृषी विभागाने घेतला आहे. एक रुपयात पीक विमा योजनेत मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळे झाल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून सरकारने हा निर्णय घेतला आहे.

### शेतकऱ्यांना उध्वस्त करणारी नवी पीकविमा योजना

नवी पिक विमा योजना भ्रमनिरास करणारी असून, शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत अत्यंत अल्प अशी नुकसान भरपाई मिळेल. शासन स्वतःचा पैसा वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना वेठीस धरत आहे. या योजनेचा अतिशय अल्प फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. शासन नेहमी शेतकरी विरोधी निर्णय घेत आहे. ही योजना शेतकऱ्यांना उध्वस्त करणारी आहे.



अनिल जगताप,
विमा अभ्यासक.

# भरधाव कारच्या धडकेत नगर पालिकेची महिला कर्मचारी जागीच ठार

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव शहरात शहर स्वच्छ करणाऱ्या नगरपालिकेच्या महिला कर्मचाऱ्याला भरधाव कारने जोराची धडक दिल्यामुळे अपघातात महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. मंगल मेसू गवळी (वय-५२ रा. बेंबळी ता. जि. धाराशिव) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. बुधवारी (दि.२५) सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ख्वाजा नगर परिसरातील एम. के. फंक्शन हॉल समोरील रस्त्यावर तुळजापूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर मंगल गवळी या नगर पालिकेच्या कंत्राटी कर्मचारी झाडू मारत होत्या. त्यावेळी नेक्सॉन कंपनीची गाडी ( २४ ०२१५ ) तुळजापूरच्या दिशेने भरधाव जात होती. या गाडीने रस्त्याच्या कडेला झाडू मारणाऱ्या मंगल गवळी यांना जोराची धडक दिली. या धडकेमुळे मंगल गवळी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. धडक जोराची असल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. यावेळी गाडी चालकाने पळून जाण्याचा प्रयत्न केला मात्र तिथे उपस्थित असलेल्या इतर महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांनी गाडी चालकाला अडवून रस्त्यावरच चोप दिला. गाडीचालक हा बाहेरगावचा असून, तो लग्न समारंभासाठी धाराशिव शहरात आल्याचे समजते. धडकदिलेलीगाडीपोलिसांनीशहरपोलीसठाण्यातआणली असून, चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लाज सोडली, एसपी ऑफिसमोरच लाच घेतली

## पोलिस निरीक्षक शेळकेंसाठी कॉन्स्टेबलने घेतले ९५ हजार

### लाचखोरीचा सिंघम, धाराशिवच्या पोलिस दलाला झालंय काय.?

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिवच्या पोलिस दलात नेमकं काय चाललंय,असा प्रश्न निर्माण झाला आहे. आरोपीला गुन्ह्यात मदत करण्यासाठी कॉन्स्टेबलच्या माध्यमातून ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेळके याना अटक करण्यात आली आहे. ९५ हजारांची लाच स्वीकारणाऱ्या पोलिस निरीक्षक शेळके यांच्यासह कॉन्स्टेबलवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, जिल्ह्यात लाचखोरीचा पॅटर्न सुरू झालाय का,असा प्रश्न विचारला जात आहे.चार दिवसांपूर्वीच वाशीमध्ये पोलिस अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना अमानुषपणे मारहाण करून निर्दयीपणाचे दर्शन दाखवले होते. धाराशिव ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मारूती शेळके हे वादग्रस्त अधिकारी असून, त्यांच्याविरोधात कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

एका गुन्ह्यात मदत करण्यासाठी एक लाख रुपयांची लाच मागून ९५ हजार रुपये स्वीकारताना धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारोती शेळके आणि त्याच पोलीस स्टेशनची अंमलदार मुक्ता लोखंडे या दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. एकाच प्रकरणात पोलीस स्टेशनच्या दोन कर्मचाऱ्यांवर ट्रॅप झाल्यामुळे पोलीस प्रशासनात खळबळ उडाली आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार महिलेला त्यांच्या मुलाच्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी अंमलदार असलेल्या मुक्ता लोखंडे यांनी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारोती शेळके यांच्यासाठी व स्वतः साठी तक्रारदार महिलेकडे १ लाख रुपयांची लाचेची मागणी केली होती.तक्रारदार यांनी यासंदर्भात लाचलुचपत विभागाकडे तक्रार दिली होती. त्यांच्या तक्रारीनंतर बुधवारी (दि.२५) शासकीय पंचासह मारोती शेळके यांची त्यांच्या पोलीस स्टेशन येथे भेट घेऊन कामा संदर्भात चर्चा केली असता सदर चर्चेत त्यांनी मुक्ता लोखंडे हिला भेटण्यास सांगितले. त्या वेळी आरोपी मुक्ता लोखंडे यांनी तक्रारदार यांच्याकडे पोलीस निरीक्षक मारोती शेळके यांच्यासाठी १ लाख रुपयाची मागणी करून तडजोड अंती ९५ हजार रुपये लाचेची रक्कम शासकीय विश्रामगृह, धारशिव येथे स्वीकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. पडताळणी झाल्यानंतर शासकीय विश्रामगृह, धाराशिव च्या समोर शासकिय पंच यांच्या समक्ष तक्रारदाराकडुन लाच स्विकृती सापळा कारवाईचे नियोजन केले असता, तक्रारदार यांच्या कडून मुक्ता लोखंडे यांनी लाचेची ९५०००/- हजार रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले. दोन्ही आरोपींचे मोबाईल आणि इतर साहित्य ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या विरोधात भ्र. प्र. अधिनियम १९८८ चे कलम ७, ७ अ प्रमाणे मारोती निवृत्ती शेळके (वय ५४ वर्षे) यांनी सदरची लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिल्याने त्यांच्या विरोधात भ्र. प्र. अधिनियम १९८८ चे कलम १२ प्रमाणे पोस्टे आंनदनगर, धाराशिव येथे गुन्हा दाखल करण्यांची प्रक्रिया सुरू आहे. यावेळी सापळा अधिकारी म्हणून योगेश वेळापुरे, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि धाराशिव यांनी तर सहायक सापळा अधिकारी म्हणून बाळासाहेब नरवटे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि धाराशिव यांनीकामपाहिले.या कारवाईत दोघांच्या अंगझडतीत एकूण तीन मोबाईल फोन, एक मोटारसायकल आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले असून, त्यांचे विश्लेषण सुरू आहे. यातून आणखी काही धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.या कारवाईमुळे धाराशिवच्या पोलिस दलाची मान शरमेने खाली गेली आहे.



### शेळकेंची वादग्रस्त कामगिरी

२०११ साली सिंघम चित्रपट प्रदर्शित झाला होता.इमानदार पोलीस अधिकारी असलेल्या बाजीराव सिंघमने त्या चित्रपटात जयकांत शिक्रे आणि त्याच्या गुंडांना सळो की पळो केलेलं आपण चित्रपटात पाहिलंय. त्याचदरम्यान मारुती शेळके हे कळंब पोलिसात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते. ते स्वतःची सिंघम म्हणून प्रतिमा मिरवायचे. चित्रपटातल्या सिंघमच्या बाजूने गावातील सामान्य जनता होती. मात्र या तथाकथित सिंघमची कारकीर्द ही वादग्रस्त राहिली. विनाकारण विद्यार्थ्यांना मारणे, संशयित म्हणून पोलीस स्टेशनला बोलवून वर्दीचा धाक दाखवून मारहाण करणे. व्यापाऱ्यांना भस्त्यात मारणे, वृद्धांवर हात उचलणे, अशी पार्श्वभूमी शेळके यांची राहिली आहे.

# पार्वती हॉस्पिटलमध्ये प्रचंड तोडफोड

### कारवाईच्या मागणीसाठी डॉक्टरांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आरंभ मराठी | धाराशिव

शहरातील पार्वती हॉस्पिटलमध्ये मंगळवारी रात्री अज्ञात लोकांनी प्रचंड प्रमाणात तोडफोड करून रुग्णालयीन कर्मचाऱ्यांम ध्ये दहशत निर्माण केली असून, याप्रकरणी संबंधितांवर तातडीने कारवाई करावी, या मागणीसाठी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने बुधवारी जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. तसेच या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करून २४ तासांसाठी आरोग्य सेवा बंद ठेवण्यात आली. इंडियन मेडिकल असोसिएशनने जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पार्वती हॉस्पिटलमध्ये मंगळवारी रात्री काही अज्ञात लोकांनी रुग्णालयाची मोठ्या प्रमाणावर तोडफोड करून दहशत निर्माण केली आहे, अशा प्रवृत्तींना वेळीच पायबंद घालावा तसेच कठोर कारवाई करावी. निवेदनावर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.महेश कानडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत. दरम्यान या घटनेनंतर बुधवारी शहरातील सर्व डॉक्टरांनी आपली वैद्यकीय सेवा २४ तासासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आरोग्य सेवा कोलमडली होती. या घटनांमुळे वैद्यकीय क्षेत्रात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार रूग्णालयात आलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांनी ही तोडफोड केली असून, यादरम्यान काही कर्मचाऱ्यांनाही मारहाण झाल्याचे सांगण्यात येत आहे. तोडफोडीत रुग्णालयातील केबिन,स्वागत कक्ष आणि कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# दोन संतांची भेट..गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्याचे तेरमध्ये जल्लोषात स्वागत

आरंभ मराठी | तेर

दरवर्षीप्रमाणे आषाढी एकादशी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी संत गजानन महाराजांचा पालखी सोहळा संत नगरी शेगाव येथून पंढरपूरकडे निघाला असून बुधवारी (दि.२५) सकाळी तेर येथे संत गोरोबाकाकाच्या भेटीला समाधी मंदिरात दाखल झाला. याठिकाणी भाविकांनी भक्तीमय वातावरणात गजानन महाराज पालखीचे दर्शन घेतले. गण गण गणात बोते,अखंड चिंतन गजाननाचे भजन गात पालखी सोहळा किणी गावातून उपळा येथे मुक्कामाला पोहोचला. यावेळी संत गजानन महाराज व संत गोरोबाकाका यांच्या दर्शनासाठी तेर व परिसरातील भाविकांची मोठी गर्दी होती. पालखीचे तेर मध्ये आगमन होताच ठिकठिकाणी फटाके फोडून पालखीचे स्वागत करण्यात आले. संत गोरोबाकाका मंदिरात गावकऱ्यांच्या वतीने नाष्ट्याची सोय करण्यात आली होती. १३ जून रोजी पालखी सोहळा शेगाव येथून निघाला होता. श्रींच्या पालखीत ७०० वारकरी, २५० पताकाधारी, २५० टाळकरी आणि २०० सेवेकरी,३ अश्व , असा मोठा ताफा सहभागी झाला आहे. ३३ दिवसात ७५० कि.मी. पायी प्रवास करून ही पालखी ४ जुलै रोजी पंढरपूर येथे पोहोचणार आहे. यंदा पालखीचे हे ५६ वे वर्ष आहे. संत गोरोबाकाका शिव मंदिर संस्थांच्या वतीने मंदिराच्या प्रशासक तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त रूपाली कोरे निरीक्षक अतुल नळणीकर यांनी गजानन महाराज पालखीचे स्वागत केले. संत गजानन महाराजांची पालखी विविध अभंगांच्या निनादात भक्तिमय वातावरणात पंढरपूरकडे मार्गस्थ झाली आहे. किणी येथील दुपारच्या विसाव्यानंतर पालखी सोहळा उपळा मुक्कामी थांबून. आज २६ रोजी धाराशिव शहरात दाखल होत आहे.



### नाभिक समाजाची सेवा

नाभिक समाजाच्या वतीने पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांची कटिंग,दाढी मोफत करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून तेर येथील नाभिक समाज गजानन महाराज पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांची सेवा करीत आहेत.

# लाठीचार्ज प्रकरणाची पोलिस महासंचालकांकडे तक्रार

## उप अधीक्षक राठोड यांना बडतर्फ करण्याची मागणी

आरंभ मराठी | वाशी

वाशी तालुक्यातील तांदूळवाडी येथे शनिवार (दि.२१) रोजी झालेल्या शेतकरी लाठीचार्ज प्रकरणाची तक्रार पोलिस महासंचालक वीरेंद्र मिश्र यांच्याकडे करण्यात आली आहे. शेतकरी गणेश शेरकर व नगरसेवक राजु कवडे यांच्याकडून पोलिस महासंचालक वीरेंद्र मिश्र यांना मंगळवार धाराशिव येथे निवेदन देण्यात आले होते. त्यानुषंगाने अतिरिक्त पोलिस अधीक्षक शफकत अमना यांनी बुधवार (२५) रोजी तांदूळवाडी येथे घटनास्थळी जात स्थळपाहणी केली. पवनचक्की मोबदला प्रकरणातून वाशी तालुक्यातील तांदूळवाडी येथे शेतकऱ्यांवर पोलिसांकडून झालेल्या अमानुष लाठीचार्जची घटना शनिवार रोजी घडली होती. याबाबत पोलिस महासंचालक वीरेंद्र मिश्र यांच्याकडे शेतकऱ्यांनी पोलिस उपअधीक्षक स्वप्नील राठोड यांनी केलेल्या अत्याचाराची माहिती देऊन राठोड यांच्यावर कारवाईची मागणी केली. यावेळी पोलिस महासंचालक वीरेंद्र मिश्र यांनी शेतकऱ्यांची तक्रार ऐकून घेत पोलिस अधीक्षकांना घटनास्थळी जाऊन सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने अतिरिक्त पोलिस अधीक्षक अमणा यांनी घटनास्थळाची पाहणी करून चौकशी केली.

### लाठीचार्जचा छंद असणाऱ्या उपअधिक्षकला बडतर्फ करा

पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांशी मावेजा संबंधी बोलणी सुरू असताना शेतकऱ्यांचे म्हणणे समजून न घेता पोलिस उपअधीक्षक स्वप्नील राठोड यांनी अर्वाच्च भाषा वापरत शेतकऱ्यांवर विनाकारण अमानुष लाठीचार्ज केला. तसेच याअगोदरही पोलिस उपअधीक्षक स्वप्नील राठोड यांनी धाराशिव येथे शिवभक्तांवर लाठीचार्ज केल्याची घटना घडली होती.त्यामुळे पोलिसांची प्रतिमा मलिन होत असून लाठीचार्जचा छंद असणाऱ्या उपअधिक्षकला बडतर्फ करण्याची मागणी नगरसेवक राजु कवडे यांनी पोलिस म हासंचालक व जिल्हाधिकारी यांच्याकडे केली.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संपादकीय गुरुवार, दि. 26 जून 2025

# लोककल्याणकारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज



छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कसबा बावडा येथे झाला.१८८४ साली ते छत्रपतींच्या कोल्हापूर गादीवरती दत्तक म्हणून आले.१८८४ ते १८९४ या दहा वर्षात त्यांनी राजकोट आणि धारवाड या ठिकाणी उच्च शिक्षण पूर्ण केले. १८९४ साली त्यांचा राज्याभिषेक झाला. राज्याभिषेकानंतर त्यांनी आपल्या राज्याचा दौरा केला. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या कष्टकरी, श्रमकरी, शेतकरी, वंचित, उपेक्षित, भूमिहीन प्रजाजनांचे दुःख पाहून त्यांचे मन हेलावले, छत्रपतीच्या अंतःकरणामध्ये प्रचंड वात्सल्य होते. ते जसे स्वाभिमानी होते, तसेच ते प्रेमळ होते. आपल्या राज्यात अमुलाग्र बदल करण्याचा संकल्प त्यांनी केला. राज्यारोहणामुळे शाहू महाराजांचा सत्कार पुण्यातील सार्वजनिक सभेने आयोजित केला होता, त्यादरम्यानच पुण्यात हिंदू-मुस्लिम दंगल झालेली होती आणि या दंगलीला टिळकाची मदत होती, टिळक हे वयाने शाहू महाराजांपेक्षा वीस वर्षांनी मोठे होते. सत्कार प्रसंगी शाहू महाराज म्हणाले ''हिंदू-मुस्लिमांनी एकोप्याने राहावे, भांडण करू नये'' शाहू महाराजांची वयाच्या विसाव्या वर्षीची प्रगल्भता ही त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाची प्रचिती आहे. टिळक दंगल घडविण्याच्या बाजूचे तर शाहू महाराज शांतता प्रस्थापित करणारे होते. शाहू महाराजांनी आपल्या राज्यात शिक्षणाचा प्रसार केला. प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी सक्तीचे आणि मोफत केले. शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही, हे त्यांचे विचार होते. मंदिरातील पैसा शिक्षणासाठी वापरला. सर्व जाती धर्मातील मुलांसाठी कोल्हापुरात वसतिगृहांची स्थापना केली. मराठा बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, जैन बोर्डिंग, दलित बोर्डिंग, लिंगायत बोर्डिंग इत्यादी बोर्डिंगची स्थापना शाहू महाराजांनी केली. पुणे येथील श्री. शिवाजी मराठा सोसायटी, ऑल इंडिया श्री. शिवाजी मेमोरियल सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, नाशिक येथील उदाजी मराठा शिक्षण संस्था, नागपूर येथील शिक्षण संस्था, चेन्नई येथील शिक्षण संस्था अशा अनेक शैक्षणिक संस्था उभारण्यात शाहू महाराजांचा पुढाकार होता. रयत शिक्षण संस्था स्थापन करणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण शाहू महाराजांच्या राजवाड्यावर राहून झाले. त्यांनी मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले.राजर्षी शाहू महाराजानी १९१७ साली विधवा पुनर्विवाहाचा कायदा केला. १९१९ साली आंतरजातीय विवाहाचा कायदा केला. बाजारपेठ स्थापन केली. जयसिंगपूर शहराची स्थापना केली. त्यांनी भारतातील सर्वाधिक जलसाठ्याचे राधानगरी हे पहिले धरण भोगावती नदीवर १९०८ साली बांधले. छत्रपती शिवाजी राजांचा जगातील पहिला अश्वारूढ पुतळा १९२१ साली पुणे या ठिकाणी प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते उभारला. पहिले शिवचरित्र लिहिणाऱ्या कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यांच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहिले.१८९९ साली वेदोक्ताचा अधिकार नाकारणाऱ्या पुरोहिताची त्यांनी हकालपट्टी केली. बहुजन पुरोहित तयार करणारी शिवाजी वैदिक शाळा त्यांनी सुरू केली. डोणे नावाचे धनगर विद्वान त्या शाळेचे प्राचार्य होते. भास्करराव जाधव यांनी घरचा पुरोहित नावाचे पुस्तक लिहिले. बहुजनांचा आणि ब्राह्मणांचा धर्म एक नाही, हे त्यांनी स्वतंत्र धर्माची स्थापना करून सिद्ध केले. स्वतंत्र धर्मपीठावर त्यांनी सदाशिव लक्ष्मणराव पाटील बेनाडीकर या विद्वानाची नियुक्ती केली. शाहू महाराजांनी आपल्या राज्यात कधी भेदाभेद केला नाही. याउलट उपेक्षित, वंचित, भूमिहीन, अस्पृश्य, शेतकरी, कष्टकरी, श्रमकरी जातींना त्यांचा डावललेला हक्क अधिकार मिळावा, यासाठी १९०२ साली आरक्षणाची सुरुवात केली. भारतात आरक्षणाचा पाया घालणारा राजा म्हणजे शाहू महाराज होय. प्रशासनातील एकाधिकारशाहीला त्यांनी पायबंद घातला. त्यांनी सर्व जातींना प्रसासनात प्रतिनिधित्व दिले. त्यांनी मराठा समाजालाही आरक्षण दिले की जे आजच्या व्यवस्थेने हिरावून घेतले. शाहू महाराज हे बुद्धिप्रामाण्यवादी होते, त्यांनी भविष्य, पंचांग, मुहूर्त कधीही पाहिला नाही. भविष्य सांगण्यासाठी आलेल्या जोतिष्याला तुरुंगात डांबून त्याला बुद्धिप्रामाण्यवादाचे महत्व पटवून दिले. त्यांनी भाकडकथा, पुराणकथा नाकारून प्रतिगामी विचारांना नेस्तनाबूत केले. त्यांनी ग्रंथप्रामाण्य नाकारले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यात कृषी क्षेत्रात आमूलाग्र क्रांती केली. नगदी पिकांना चालना दिली. पन्हाळा टी-४ हा चहाचा वाण विकसित करून त्याची लागवड केली. तो चहा निर्यात होत असे. त्यांनी शेतीत आधुनिकीकरण आणले. शेतीसाठी बाजारपेठ उभारली. पाणीपुरवठ्याची सोय केली. शेतीला जोडधंदा म्हणून अनेक उद्योगांची उभारणी केली.आपल्या राज्यात समता प्रस्थापित करण्यासाठी शाहू महाराजांनी आपले राजेपद पणाला लावले. ज्या जातींना गुन्हेगार ठरवण्यात आलेले होते, अशा जातीवरचे निर्बंध राजांनी उठवले. त्यांना नियमित हजेरीतुन मुक्त केले. त्यांना आपल्या राज्याच्या संरक्षण खात्यात महत्त्वाच्या पदावरती नेमले. अस्पृश्यता नष्ट व्हावी, यासाठी ते अस्पृश्याच्या घरी जेवले. अस्पृश्यांना आपल्या राजवाड्यावर स्नेहभोजन ठेवले. अन्यायग्रस्त गंगाराम कांबळेला न्याय देऊन त्याला हॉटेल टाकून दिले. त्या हॉटेलला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, यासाठी स्वतः शाहू महाराज आपल्या सहकाऱ्यांना घेऊन हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी जात असत. महार, मांग, चांभार इत्यादी पैलवानाबरोबर देशभरातून आलेल्या पैलवानांनी कुस्ती खेळावी म्हणून त्यांना जाट, सरदार, पंडित अशी नावे दिली. महिलांचा आदर सन्मान करणारे त्यांचे धोरण होते. विधवा पुनर्विवाह कायदा केला. त्यांना शिक्षण मिळावे यासाठी अनेक योजना सुरू केल्या. आपल्या कुटुंबातील स्त्रियांना शिक्षण दिले. महाराणीच्या हस्ते धरणाचे उद्घाटन केले तर कन्या राधाबाई यांचे नाव धरणाला दिले. तेच इतिहासप्रिद्ध राधानगरी धरण आहे. जातिभेद नष्ट व्हावा, यासाठी शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहाला चालना दिली. याची सुरुवात त्यांनी स्वतःच्या कुटुंबापासून केली. त्यांनी आपली बहीण चंद्रप्रभादेवी यांचा विवाह इंदोरचे यशवंतराव होळकर यांच्या बरोबर निश्चित केला, तो पुढे राजाराम महाराजांनी लावून दिला, असे सुमारे २५ आंतरजातीय विवाह घडवून आणले, यातून त्यांनी मराठा- धनगर आणि इतर जाती एकमेकांचे विरोधक नसून नातेवाईक आहेत, हे सिद्ध केले. म्हणजे शाहू महाराज हे केवळ बोलके सुधारक नव्हते, तर कर्ते सुधारक होते, छत्रपतींची परंपरा जातीव्यवस्था मोडणारी व समता प्रस्थापित करणारी परंपरा आहे. छत्रपतींची परंपरा जातीव्यवस्था पाळणारी विषमतावादी परंपरा नाही. छत्रपतींची परंपरा प्रगल्भ परंपरा आहे, ती संकुचित नाही. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उच्च शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत केली. मूकनायक या नियतकालिकासाठी मदत केली. शाहू महाराज म्हणाले ''बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे नेते आहेत आणि तेच खरे लोकमान्य आहेत''. शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या मुंबई येथील घरी जाऊन त्यांचा सत्कार केला, याप्रसंगी शाहू महाराज म्हणाले ''रमाबाई माझी धाकटी बहीण आहे, तुम्ही लंडनवरून परत येईपर्यंत मी तिला माहेरी कोल्हापूरला घेऊन जातो''माणगाव आणि नागपूर येथील परिषदेत जाऊन शाहू महाराजांनी बाबासाहेबांना खंबीर पाठिंबा दिला. शाहू महाराजांनी बाबासाहेबांना सोनतळी कॅम्प वरती स्नेहभोजन दिले आणि मानाचा जरीपटका देऊन सत्कार केला. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात छत्रपतींनी मानाचा जरीपटका माझ्या मस्तकी चढविला, त्याचा मी सदैव सन्मान राखीन''शाहू महाराजांच्या मुला-मुलींच्या लग्नात करवले म्हणून भटक्या विमुक्त, दलित जातीतील समवयस्क मुला-मुलींना सोबत घेतले होते, जेणेकरून विषमता नष्ट व्हावी व सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, हे शाहू महाराजांचे धोरण होते. शाहू महाराजांनी आपल्या राज्यात हिंदू-मुस्लिम हा भेद केला नाही. मुस्लिमांच्या शिक्षणासाठी त्यांनी मुस्लिम बोर्डिंगची स्थापना केली. आपल्या राज्यातील गरिबातल्या गरीब मुस्लिमांना कुराण मराठी भाषेत वाचता यावे, यासाठी अरबी भाषेतील कुराणाचे मराठी भाषांतर करण्यासाठी पंचवीस हजार रुपयाची देणगी दिली. शंभर वर्षांपूर्वीची ही रक्कम खूप मोठी रक्कम आहे. शाहू महाराजांनी पाटगावच्या मौनी बाबाच्या मठाच्या उत्पन्नातील रक्कम तेथील मुस्लिमांच्या मशिदीच्या बांधकामासाठी दिली, तर रुकडीतील पिराच्या देवस्थानाच्या उत्पन्नातील रक्कम तेथील अंबाबाई मंदिराच्या बांधकामासाठी व दिवाबत्तीसाठी दिली, इतका सामाजिक सलोखा शाहू महाराजांच्या राज्यात होता शाहू महाराजांनी शाहीर लहरी हैदर, चित्रकार आबालाल रहमान, गानमहर्षी अल्लादिया खाँसाहेब, मल्लविशारद बालेखान वस्ताद, बालगंधर्व यांना सर्वतोपरी मदत केली. शाहू महाराजांनी सामाजिक समतेसाठी आणि सामाजिक सलोख्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले, शाहू महाराजानी आपल्या राज्यात सर्वांचा विकास आणि शांतता प्रस्थापित व्हावी, यासाठी सनातनी व्यवस्थेविरुद्ध उघडपणे संघर्ष केला, परंतु आज सामाजिक वातावरण बिघडवले आहे, जातीजातीत आणि धर्माधर्मात विष पेरले जात आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. सर्व समाज बांधवांनी एकोपा जपावा, हे शाहूचरित्र सांगते, शाहू महाराजांचा सामाजिक सलोखा आपण कायम ठेवणे, हेच खरे शाहू प्रेम आहे. शाहू राजांची जयंती (२६ जून) सणासारखी साजरी करा, असे डॉ. आंबेडकरांनी सांगितले आहे. त्यांच्या विचारांचे आपण आचरण करूया. आज शाहू महाराजांची जयंती (२६ जून ) आहे.



डॉ.श्रीमंत कोकाटे,
ज्येष्ठ विचारवंत

## आषाढस्य प्रथम दिवसे

आषाढस्य प्रथम दिवसेही नळ आठ
दिवसांनी येतो
पाणी पुरवायचं कसं?
हा यक्षप्रश्न आम्हाला छळतो

यक्षाचं बरं होतं
पाण्याचं झंजट त्याला नव्हतं
म्हणूनच तर त्याला विरहात वेळ
घालवणं जमत होतं

आम्हालाही दिसतोच की मेघ
आनंदही वाटतो त्याला बघून
कोसळावा वाटतो आम्हाला तो पुढे
नं जाता दूत बनून

कोसळावं भरभरून रानोमाळ त्यानं
हर्षावी धरती सारी लेऊन नवतीची
पानं

बळीराजाच्या मुखावरचा आनंद
त्यानं व्हावं
अन् त्याच आनंदात त्यानं आषाढी
वारीला जावं
आषाढी वारीला जावं

-अनिल ढगे

## बरं झालं तेंव्हा

बरं झालं कालिदासाच्या काळात
मोबाईल नव्हता
नाहीतर यक्षानं प्रेयसीला मेसेज
केला असता
तिनेही दिला असता रिप्लाय
मिसिंग यु म्हणून

मोबाईल नव्हता म्हणून वॉटसॅपही
नव्हतं
नाहीतर यक्षानं आपलं स्टेटस
अपडेट केलं असतं
त्याच्या प्रेयसीनंही
विरही प्रोफाईल ठेवलं असतं

त्यामुळे यक्ष विरहाग्नीत जळालाच
नसता
अन् मेघदूताचा आधार त्याला
घ्यावा लागला नसता

मग मेघाशी त्याचा संवादच झाला
नसता
आणि अवघा रसिकजन मेघदूतम
ला मुकला असता
मेघदूतमला मुकला असता

## तेव्हा माणुसकी ओशाळली

माणसं असुनही माणसांनी
जगण्याची सभ्यता सोडली
नात्यांची घट्ट वीण तोडली
तेव्हा माणुसकी ओशाळली

माणसांचे जगणे होते साधे
तोवर माणूस म्हणून तो शोभे
अंतर्मनात वासना उफाळली
तेव्हा माणुसकी ओशाळली

माणूस माणसाला ओळखायचा
तोवर माणूस माणसांत राहिला
स्वार्थापोटी माणुसकी त्यागली
तेव्हा माणुसकी ओशाळली

आईमुळे उजळे घराचे घरपण
आईमुळेच शोभे घराचे अंगण
मुलाने आई वृद्धाश्रमात ठेवली
तेव्हा माणुसकी ओशाळली

कुटुंबासाठी बाप कष्टतो राबतो
लेकरांसाठी जीवन अर्पितो
पोराने बापाची लाज काढली
तेव्हा माणुसकी ओशाळली


माणूस मदतीला धावून यायचा
तोवर माणुसकीला जपायचा
भावाने भावाची साथ सोडली
तेव्हा माणुसकी ओशाळली

दिवाळीला बहिण माहेरी यायची
भाऊबीज जोरात साजरी व्हायची
भावाने बहिणीची माया विसरली
तेव्हा माणुसकी ओशाळली

माणसाने माणसांसारखे जगावे
माणुसकीचे तंत्र त्याने जपावे
नातलगांशी त्याने प्रेमाने वागावे
जीवनाचे सार समजून घ्यावे

**बबन दामोदर गुळवे**
उमरगा
कोर्ट ता.अहमदपूर जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

# लोकराजा राजर्षी शाहू महाराज



भारतातील संस्थानिक राजांचा इतिहास पाहिला तर एकीकडे इंग्रजांची गुलामी करत दुसरीकडे आपल्या संस्थांनामध्ये भोग विलासाचे आयुष्य जगणारे अनेक संस्थानिक राजे होऊन गेले परंतु भारतात खऱ्या अर्थाने ज्यांना लोकराजा म्हणता येईल असा राजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज! दूरदृष्टी आणि द्रष्टेपण याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे राजर्षी !!आजच्या राज्यकर्त्यांना सगळी सत्ता आणि घटनादत्त अधिकार असतानाही ज्या सुधारणा करायचे धाडस सहज होत नाही त्या सुधारणा शंभर वर्षांपूर्वी राजर्षी शाहू महाराज यांनी केल्या. प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे असावे असा कायदा करून शिक्षणाचे नेमके महत्व राजर्षी शाहू महाराज यांनी ओळखले होते.मुलांसाठी वसतिगृहे तर काढलीच पण आधी अस्पृश्याना वेगळ्या शाळांची तरतूद करून नंतर त्यांना शाळेची सवय आणि गोडी लागली की वेगवेगळ्या शाळा बंद करून सगळ्याना एकत्र बसवण्याचे क्रांतिकारी कार्य शाहू महाराज यांनी केले. अमेरिकेत काळ्या व गोऱ्या विद्यार्थ्यांचं शाळेत पृथक्करण आणि नंतर एकत्रीकरण करणे हा विषय १९६० च्या काळात छेडला तेव्हा प्रचंड वाद व दंगली झाल्या नंतर ७० च्या दशकात तो विचार अंमलात यायला सुरुवात झाली.त्यामानाने शाहू महाराज समतेच्या लढाईत किती पुढारलेले होते हे लक्षात येतं.तोफा वितळून शेतीची औजार करणे,दुष्काळात लोकांसाठी अन्नछावण्या आणि रोजगार योजना आखून त्या पार पाडणे, धरण बांधून सिंचनाची व्यवस्था करणे, साथीच्या रोगात आयसोलेशन सेंटर उभारून लोकांना वाचवणे अशी अनेक लोकोपयोगी कामे आपल्या अल्पशा आयुष्यात शाहू महाराजांनी केली म्हणूनच खऱ्या अर्थानं शाहू महाराज हे लोकराजा ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शाहू महाराजांची जयंती सणासारखी साजरी करावी असे आवाहन केले होते ते काही उगाच नव्हे.डॉ.बाबासाहेबांचे त्याकाळचे सहकारी शिवतरकर मास्तर यांना ४ सप्टेंबर १९१९ रोजी लिहिलेल्या पत्रात शाहू महाराज म्हणतात, की मला अस्पृश्य हा शब्दच आवडत नाही. हा शब्द ऐकून मला माझ्या कानात तप्त सळई घुसवल्यासारख्या वेदना होतात. अस्पृश्य या शब्दाच्या जागी सोमवंशी शब्दाचा वापर करावा किंवा त्यांना पंचम या नावाने ओळखले जावे. कारण मद्रास मध्ये हा समूह पंचम या नावाने ओळखला जातो. दलित लोकांसाठी अस्पृश्य शब्द वापरणाऱ्यावर न्यायालयात खटला का चालवू नये? असा प्रश्नही शाहू महाराज उपस्थित करतात. यावरून अस्पृश्यांसाठी किती अपार करुणा शाहू महाराजांच्या हृदयात वसत होती याची प्रचिती आपल्याला येते. गंगाराम कांबळे यांना स्पृश्या कडुन मारहाण झाल्यावर त्यांनी अस्पृश्यता बंदी कायदा अंमलात आणला.१९०२ मधे शिक्षण आणि नोकरीत समसमान प्रतिनिधीत्व आणि सक्तीचं शिक्षण अशा योजना त्यांनी राबवल्या. या गोष्टी खुद्द अमेरिका व युरोपातील कित्येक पुढारलेल्या देशांत पण अमलात आलेल्या नव्हत्या.असे क्रांतीकारक निर्णय राबवायला सुरुवात झाली तेव्हा शाहू महाराजांचे वय फक्त २७-२८ वर्षाचे होते. विशेष म्हणजे तेव्हा नोकरशाही ब्राह्मणांची होती. प्रत्येक पावलांवर विरोध व बदनामी होत होती तरीही एक इंचही मागे न सरकता शाहू महाराजांनी आपले समता पूरक कार्य आपली राजगादी पणाला लावून पुढे नेले.माओग्रेगर या उच्च इंग्रजी अधिकाऱ्याला ९ मे १९२१ च्या पत्रात शाहू महाराज लिहतात,एक वेळ मी मरण पत्करीन पण या ब्राह्मण नोकरशाहीत रमणार नाही, ती संपवण्याचा मी आटोकाट प्रयत्न करेन,आणि त्या दृष्टीने शाहू महाराजांनी खंबीरपणे पाऊले उचलण्यास प्रारंभही केला होता. त्या काळी 'एक महार' या टोपणनावाने बाबासाहेब मधे लेखन करायचे. सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापक पदी शासकीय नोकरीवर असल्यामुळे नियमाने त्यांना सामाजिक कार्यात सहभागी होता येत नव्हते, शासना विरूद्ध लिहायला बंदी होती म्हणून त्यांनी एक महार या टोपणनावाने लिहायला सुरु केली. धनंजय कीर लिखित बाबासाहेबांच्या चरित्रात पान नंबर ४८ वर फक्त ''टोपणनावाने लिखाण'' केले एवढाच उल्लेख आढळतो तर उत्तम कांबळे लिखित ''माणगाव परिषद'' या संशोधन ग्रंथात ते टोपन नाव ''एक महार'' होतं हे अधोरेखित केलं आहे (पान नंबर १३५). च्या १६ जानेवारी १९१९ च्या एका अंकात बाबासाहेब ''स्वराज्य हा जसा ब्राह्मणांचा अधिकार आहे तसा महारांचा पण आहे'' असा दावा टाकतात. टिळकांना त्यांचे भक्त राष्ट्रीय नेते आणि लोकमान्य म्हणतात पण टिळक स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे असे म्हणत असतानाच तेल्या तांबोळी, कुणब्यांना पार्लमेंट मधे जाऊन काय नांगर हाकायचा का? असा प्रश्न विचारुन स्वराज्य हा फक्त ब्राह्मणांचा अधिकार आहे असे अप्रत्यक्षपणे सुचवतात. बाबासाहेबांनी टिळकांची दोन्ही विधाने एकत्र करून टिळक भारताचे नाही तर ब्राह्मणांचे नेते व ब्राह्मण मर्यादित असलेले स्वराज्य मागताहेत हे लक्षात आणुन दिलं. ब्राह्मणांच्या स्वराज्याइतकेच महाराचं स्वराज्य महत्वाचं असल्याचे सांगुन समान अधिकाराची मागणी बाबासाहेबानी केली. आता महार शब्दच बाबासाहेबांनी का वापरला यावर जास्त डोकं लावु नये. तेव्हाचे ऐतिहासिक संदर्भ व पार्श्वभूमी लक्षात घेतली पाहिजे. तसंही तोपर्यंत डॉ. बाबासाहेबांनी चळवळीची भुमिका घेतली नव्हती. ते विद्यार्थीदशेत होते, लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स व ग्रेज इन मधील बॅरिस्टर ऍट लॉ शिक्षण बाकी होतं व पुढच्या ठराविक शिक्षणात अडचण नको म्हणून त्यांनी हे छोटसं धोरण ठेवलं होतं. पुढे शिक्षण पुर्ण करुन भारतात आल्यावर त्यांनी महार शब्दा ऐवजी सर्व शोषितांना सोबत घेणारी ''बहिष्कृत हितकारिणी सभा'' नावाने संघटना स्थापन केली होती हेही लक्षात घेतले पाहिजे.तेव्हा एक महार या टोपण नावाने बाबासाहेबांनी लिहिलेले ते लेख शाहू महाराजांना कळले. ते लेख वाचून बाबासाहेबांचा आवाका शाहू महाराजांना कळला तेव्हा भेटायचं ठरलं आणि शाहू महाराज आणि बाबासाहेब यांच्या भेटीचा हा प्रवास पुढे माणगाव परिषदेपर्यंत पोहोचल्याचे आपल्या लक्षात येईल. माणगावची परिषद ही अस्पृश्य वर्गाची परिषद होती. अध्यक्ष स्वतः डॉ.बाबासाहेब होते. आयोजन खुद्द शाहू महाराजांनी करुनही पहिल्या दिवशी शाहू महाराज विचारमंचावर नव्हते! दहा ते पंधरा हजार लोक आलेले असताना मोठं नियोजन असूनही तो पूर्ण दिवस बाबासाहेबां साठी शाहू महाराजांनी राखीव ठेवला होता. अस्पृश्यांचा नेता अस्पृश्यांना दिसला पाहिजे या कारणासाठी शाहू महाराज स्वतः आयोजक असूनही परिषदेला आले नाहीत, यावरून शाहू महाराज किती मोठ्या मनाचे होते याची प्रचिती येते. परिषदेच्या निमित्ताने शाहू महाराजांनी चमकोगिरी केली नाही. मी तुमचं भलं करतो मी तुमच्या साठी यांव करतो त्याव करतो हा ढोंगी आव शाहू महाराजांनी आणला नाही. दुसऱ्या दिवशीच्या दुपारच्या सत्रात शाहू आले व दिलेल्या भाषणांत पक्षांचा पुढारी जसा चार पायाचा प्राणी होऊ शकत नाही त्याप्रमाणे अस्पृश्यांचा पुढारी सवर्ण होऊ शकत नाही, तसेच मी आत्तापर्यंत तुमच्यावर केलेली माया ही सावत्र आईची माया होती आता डॉ.आंबेडकर यांच्या रूपाने मी तुम्हाला सख्खी आई देत आहे, डॉ. आंबेडकर भावी काळात नक्कीच तुमचा उद्धार करतील या आशयाची मांडणी शाहू महाराजांनी केली. शाहू फक्त इथेच थांबले नाहीत तर माणगाव परिषदेत त्यांनी बाबासाहेबांच्या या शोध निबंधावर आधारीत अल्प भुधारक शेतकरी विशेषतः महार वतनदारी करणाऱ्यांना उद्देशून मार्गदर्शन केलं. साऊथब्युरोला बाबासाहेबांनी ज्या मागण्या केल्या त्या जातवार प्रतिनिधित्वाला मान्य केलंच पण चा आराखडाही बनवायला घेतला. परंतू बाबासाहेबांना शिक्षणासाठी परत विदेशात जावं लागलं आणि पुढच्या दोन वर्षांच्या काळात शाहू महाराजांचे निर्वाण झाले म्हणून कसं असतं हे आपल्याला बघता आलं नाही. शोषितांचा प्रतिनिधी शोषितांनीच निवडला पाहिजे, तो शोषितांनीच घडवला पाहिजे हा शोषितांचा अधिकार आहे. फक्त त्यांना आवश्यक ते बळ आपण पुरवायला हवं हे शाहूना जेवढं कळलं तेवढं गांधी, नेहरू, पटेल या सारख्यांनाही तेव्हा कळलं नाही ही शोकांतिका आहे. आणि आजच्या काळातही स्वतःला नेहरुवादी-गांधीवादी म्हणवुन घेणाऱ्यांनीही शाहू महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवल्याचे दिसून येत नाही. शाहूचं होतं, प्रागतिक होतं,मानवी संवेदनशीलतेने परीपुर्ण होतं. नेहरूवादी-गांधीवादी बनुन फिरणाऱ्यांनी कधी शाहूवादी बनण्याचा प्रयत्न करावा महाराष्ट्र बदलायला वेळ लागणार नाही. शाहू जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.



दीपक डावरे
९४२००२२७५८

# तुमच्या प्रतिष्ठेसाठी मुलांचं जगणं हिरावून घेऊ नका..

आटपाडी तालुक्यात एका मुलीला नीटच्या सराव परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून शिक्षक असलेल्या पालकाने केलेल्या मारहाणीत मुलीचा झालेला मृत्यू खूपच दुर्दैवी आणि क्लेशदायक आहे. समाजातील खोट्या प्रतिष्ठेसाठी पालक आपल्या मुलांना वेठीस धरतात. आपल्या अपेक्षा मुलांवर लादतात.प्रत्येक पालकाला आज वाटतय माझा पाल्य इंजिनिअर व डॉक्टर झाला पाहिजे.यासाठी पालक मुलांवर लाखो रुपये खर्च करतात.नुसते पैसे खर्च करुन मुले डॉक्टर इंजिनिअर होत नाहीत.हे पालकांनी लक्षात घेतले पाहिजे.प्रत्येक पाल्य हा वेगळा असतो.प्रत्येकाची बुद्धीमत्ता व कुवत भिन्न असते.तसेच प्रत्येकाची आवडही वेगवेगळी असते.त्यानुसार मुले शिकत असतात.याचा विचार करून आपल्या इच्छा मुलांवर लादू नयेत.मुलांच्या आवडीचा विचार न करता पालक मुलांवर डॉक्टर इंजिनिअर होण्यासाठी प्रचंड दबाव टाकतात.एक प्रकारे त्यांचा मानसिक छळच करतात. त्याची आवड नसेल ,त्याला ते अवघड वाटत असेल तर दुसरा पर्याय निवडावा.त्याच्या मनाचा विचार करुन निर्णय घ्यावा. डॉक्टर इंजिनिअर झाले तरच आयुष्य यशस्वी झाले असे काही नसते. तुमच्या मनगटात धमक असेल तर तुम्ही एखाद्या परीक्षेत नापास झाला तरी पुन्हा नव्याने आपले आयुष्य घडवू शकता.आज लाखो मुले नीट जेईई परीक्षेचा अभ्यास करताना प्रचंड ताण तणाव सहन करतात.सगळीच मुले काही यशस्वी होत नाहीत.म्हणून त्यांना मारहाण करणं हे योग्य नाही.आणि मुलांच्या शिक्षणासाठी पालकांनी खर्च करणं ही पालकांची जबाबदारी व कर्तव्य आहे.त्यासाठी मुलांना बोलणे चुकीचे आहे. तुझ्यासाठी मी एवढा खर्च करतोय हे सारखं बोलून मुलांचे मानसिक खच्चीकरण करु नये.पालक आज आपल्या पाल्याची इतर मुलांशी तुलना करतात. शेजारचा,मित्राचा, किंवा नातेवाईकांचा मुलगा नीट आणि जेईई करतोय म्हणून आपल्या मुलाला नीट जेईई करायला लावतात.आपल्या पाल्याला विश्वासात घेत नाहीत.त्याला कोणत्या क्षेत्राची आवड आहे हे पाहत नाहीत. तुमच्या इच्छेपेक्षा त्याची आवड आणि कुवत,क्षमता बघा.त्याच्याशी संवाद साधा.आयुष्यात त्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी नीट आणि जेईई शिवाय अन्य पर्याय आहेत ना? विनाकारण त्याची कुवत नसताना मोठे ओझे उचलायला लावण्यात काय अर्थ आहे.ज्या मुलांसाठी तुम्ही कष्ट करता ,त्यांच्यासाठी राबता त्या मुलांना तुमचा मानसिक आधार वाटला पाहिजे.पालक म्हणून तुम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणं आवश्यक असतं.त्यांना आत्मविश्वास देणं,त्यांचे मनोबल वाढविणं,त्यांना नव्याने उभारी घेण्यासाठी बळ देण्याचं काम पालकांचं असतं.आज डॉक्टर इंजिनिअर बनण्याच्या स्पर्धेत मुले प्रचंड भरडली जात आहेत.त्यांचे जगणं हरवून जाते.त्यांना थोडीसुद्धा मोकळीक मिळत नाही.प्रचंड ओझ्याखाली दडपली जातात. अशावेळी पालक म्हणून त्यांना समजून घ्या.त्यांच्याशी शांतपणे बोला. त्यांच्या अडचणी जाणून घ्या.त्यांना धीर द्या.त्यांना पुन्हा संधी द्या.नव्याने भरारी घेण्यासाठी. नाहीतर या जगात मुलांपेक्षा मौल्यवान दुसरे आहे तरी काय ? म्हणून मुलांना जपा.त्यांना आनंदी ठेवा. तुमच्या प्रतिष्ठेसाठी त्याचं जगणं हिरावून घेऊ नका.

**लक्ष्मण जगताप**
बारामती

# आमदार स्वामी यांच्या कार्यालयाला उपविभागीय अधिकारी शेवाळे यांची भेट

आरंभ मराठी | उमरगा



उमरगा येथील प्रशासकीय सेवेतील नुतन उप विभागीय अधिकारी दत्तात्रय शेवाळे उपविभागीय अधिकारी यांनी शिवालय जनसंपर्क कार्यालय येथे आमदार प्रवीण स्वामी यांची सदिच्छा भेट नुकतीच घेतली. उमरगा लोहारा तालुक्यातील विविध विषयांवर व दोन्ही तालुक्यातील जनतेच्या समस्यांना कशा प्रकारे सोडविता येतील, विविध गावातील जनतेच्या समाज उपयोगी व लोकोपयोगी कामे तातडीने सोडवून सहकार्य करावे असे आवाहन आ. प्रविण स्वामी यांनी केले. तसेच जेष्ठ नागरिक, विधूर, तसेच अपंग व्यक्तींना तातडीने लाभ मिळावा यासह विषयावर देखील चर्चा झाली. यावेळी तुकाराम पाटील, वैजनाथ काळे, जुबेर शाणेदिवान, बालाजी सावंत यांच्यासह शिवसेना पक्षाचे जेष्ठ कार्यकर्ते व अधिकारी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# भूम शहरात अमृत योजना-२ विरोधात सर्वपक्षीय नेत्यांकडून कडकडीत बंद

## घरगुती नळांना मीटर बसवण्यास नागरिकांचा विरोध

आरंभ मराठी | भूम

अमृत योजना-२ अंतर्गत घरगुती नळ कनेक्शनवर मीटर बसवण्यास विरोध दर्शवून भूम येथे सर्वपक्षीय संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि.२५) भूम शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. बुधवारी सकाळ पासून अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद होती. नागरिक, व्यापारी, सर्वपक्षीय नेते आणि सामाजिक कार्यकर्ते एकवटून शहरातील गोलाई चौकात चक्काजाम आंदोलनात करण्यात आले.

चक्काजाम आंदोलना प्रसंगी विविध मागण्याचे निवेदन प्रशासकीय यंत्रणेला देण्यात आले. सदर निवेदनामध्ये अमृत योजना-२ अंतर्गत घरगुती नळांना मीटर बसवण्याचा निर्णय रद्द करावा, बाणगंगा तलावावरून पाणीपुरवठा करणारी जुनी पाइपलाइन पुन्हा कार्यान्वित करावी,सध्या सुरू असलेली पाइपलाइन खोदाई, सिमेंट रस्त्यांचे नुकसान, घरांना तडे जाणे यावर त्वरित तोडगा काढावा, योजनेत झालेला कथित भ्रष्टाचार तपासावा आणि दोषींवर कारवाई करावी अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. भूम शहरातील नागरिकावर आर्थिक भार टाळण्यासाठी आणि नागरिकांचे मूलभूत हक्काचे पाणी सुरळीत राखण्यासाठी अमृत २ योजनेला



त्वरित स्थगिती द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.आंदोलन प्रसंगी बोलताना विजयसिंह थोरात म्हणाले की, पाणीपुरवठ्याच्या जुन्या पद्धतीनेही रोज पाणी देता येते, मग नव्या योजनेची गरज काय असा प्रश्न उपस्थित करत ही योजना गोरगरिबांवर अन्याय करणारी असल्याचे म्हटले आहे. अमृत - २ योजनेला विरोध करण्यासाठी शहरातील सर्वपक्षीय एकतेचे दर्शन या आंदोलनात दिसून आले. शहरातील सर्व समाजघटक, व्यापारी वर्ग, महिला संघटना आणि विविध राजकीय पक्षांनी आंदोलनात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. अर्धा तास गोलाई चौकात चक्का जाम करण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी तथा प्रशासक श्रीमती शैला डाके व तहसीलदार जयवंत पाटील यांनी निवेदन स्वीकारले व नागरिकांच्या भावना जिल्हाधिकारी यांना कळवल्या जातील असे आश्वासन दिले. यावेळी माजी नगराध्यक्ष श्रीमंत विजयसिंह दादा थोरात, काँग्रेस तालुका अध्यक्ष रुपेश आप्पा शेंडगे, उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका अध्यक्ष अनिल दादा शेंडगे, भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष संतोष सुपेकर, काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष विलास शाळू, उबाठा जिल्हा उप प्रमुख दिलीप शाळू उबाठा महिला आघाडी अध्यक्ष रणदिवे ताई, ॲड अमृता गाढवे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष शहराध्यक्ष विनोद नाईकवाडी, पॅन्थर सेनेचे चंद्रमणी गायकवाड, वडार समाज संघटनेचे तालुका अध्यक्ष दीपक पवार, अल्पसंख्यांक सेल राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष अख्तर जमादार, भाजप शहराध्यक्ष बाळासाहेब वीर, मागास्वर्गीय सेल राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष गणेश साठे, भाजप नेते प्रदीप साठे, हेमंत देशमुख, शँकर खामकर, किशोर कात्रजकर, सिद्धांत जाधव, आकाश शेटे, बच्चन गायकवाड, संभाजी गरड, संभाजी वीर, अमोल सुरवसे, महेंद्र गायकवाड, विनोद वाघमारे, तसेच नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. गोलाई चौकात पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, असिस्टंट पोलीस निरीक्षक शशिकांत तवार यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

जलवाहिनी दुरुस्तीसाठी, रस्त्यांच्या कामासाठी

# भाजपाचे परंडा नगर पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



आरंभ मराठी | परंडा

परंडा शहरातील कु-हाड गल्ली परिसरातील जलवाहिनी फुटली असुन नागरिकांना ऐन पावसाळ्यात पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. यासाठी भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष अविनाश विधाते यांच्या वतीने कुऱ्हाड गल्ली येथील फुटलेली जलवाहिनी तात्काळ दुरूस्त करून पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे निवेदन पालिका मुख्याधिकारी यांना देण्यात आले. तसेच परंडा शहरात रस्त्यांची कामे चालू असुन परंडा शहरात सालाबादप्रमाणे श्री संत भगवानबाबा व श्री संत एकनाथ महाराज पालखीचे आगमन होणार आहे. परंतु या चालू रस्त्याच्या कामामुळे खासापुरी चौक, आगरकर गल्ली ते मुख्य बाजारपेठ पर्यंत रस्ता उखडून टाकला आहे. सदरील पालखी मार्ग याच रस्त्याने असल्याने शहरातील नागरिक व ग्रामीण भागातील नागरिकांना मुख्य बाजारपेठेत जाताना अतिशय त्रासदायक ठरत आहे. येणाऱ्या दोन्ही पालखी या याच मार्गाने येतात त्यामुळे वारकऱ्यांनाही हे त्रासदायक ठरू शकते. यासाठी भाजपा शहराध्यक्ष उमाकांत गोरे यांनी निवेदन दिले. यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. जहीर चौधरी, युवा नेते समरजीतसिंह ठाकूर, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस रामकृष्ण घोडके, धनंजय काळे, गौरव पाटील, मनोहर पवार, आदर्श ठाकूर, मिलिंद शिंदे, व्यंकटेश दिक्षित, आप्पासाहेब मदने, शिवम भातलवंडे तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सह्याद्री प्रकल्पातील काळ्या रानकुत्र्याची दुर्मीळ म्हणून नोंद

आरंभ मराठी | सातारा

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प एक दुर्मिळ रानकुत्रा (मेलेनिस्टिक) याची नोंद झाली आहे.सदर रान कुत्रा हा सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील बफर झोन मध्ये फिरण्यास गेलेल्या कराड येथील पर्यटक दिग्विजय पाटील यांना दिसला आहे.त्याचे छायाचित्र त्यांनी आपल्या मोबाईल मध्ये कैद केले.वनविभागाच्या नोंदी नुसार १९३६ मध्ये तमिळनाडूतील कोईमतूर वन विभागातील गड्डेसल येथे शिकारी,निसर्गशास्त्रज्ञ, कॉफी प्लांटर आणि स्कॉट्समन आर. सी. मॉरिस यांनी एका काळा रानकुत्रा (मेलेनिस्टिक) नोंद केली होती.रानकुत्रा / कोळशिंदा (वाईल्ड डॉग) शास्त्रीय नाव (कुओन अल्पिनुस)हा रंगाने तांबूस लालसर असतो. रानकुत्र्याचे कान टोकाकडे गोलाकार असतात.हनुवटी खालचा भाग पंधराट असतो. रानकुत्र्याच्या शेपटीचा टोकाकडील बहुतांश भाग हा काळसर असतो. रानकुत्र्याची उंची ४३ ते ४५ से.मी. पर्यंत असते तर शरीराची लांबी ३ फुटापर्यंत असते.नराचे वजन २० किलोच्या आसपास असून मादीचे वजन नरापेक्षा कमी असते. कळपाने राहणाऱ्या या प्राण्याच्या वास्तव्य जंगला मध्ये दिसून येते. रानकुत्रा कळपाने शिकार करतात. त्यामुळे त्यांना मोठ्या व ताकदवर प्राण्याची शिकार करण्यास मदत होते. हरीण वर्गातील प्राणी हे त्यांचे आवडीचे खाद्य आहे.कळपातील प्राण्यांचीसंख्या जास्त असल्यास ते गव्या सारख्या मोठ्या प्रण्याचीसुधा शिकार करतात.जानेवारी ते फ ब्रुवारी दरम्यान पिल्लं बघावयास मिळतात.मादी एका वेळी ४ ते ६ पिलांना जन्म देते.दरम्यान सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आढळलेला हा रान कुत्रा संपूर्ण काळा होता. विभागीय वनाधिकारी सह्याद्री व्याघ्र प्रकल्प स्नेहलता पाटील,सहाय्यक वनसंरक्षक अमित भिसे यांनी ह्याबाबत कळवले असून सदर परिसरात कॅमेरा लावून अधिक माहिती व अभ्यास करण्याच्या सूचना वनरक्षकांना देण्यात आल्या आहेत.



छायाचित्र : दिग्विजय पाटील,कराड.

जीवशास्त्रात मेलेनिस्टिक म्हणजे अशी स्थिती जिथे एखाद्या प्राण्यामध्ये मेलेनिन या रंगद्रव्याचे असामान्यपणे जास्त प्रमाण असते,ज्यामुळे त्याचा रंग नेहमीपेक्षा जास्त गडद होतो,बहुतेकदा काळा सस्तन प्राणी,पक्षी आणि सरपटणारे प्राणी यासह विविध प्रजातींमध्ये हे अनुवांशिक फरक दिसून येतो, जिथे ते काळे फर,पंख किंवा त्वचेच्या स्वरूपात प्रकट होऊ शकते. ह्या पूर्वी काळा बिबट्या सह्याद्री मध्ये नोंद झाली आहे. ही नवीन नोंद सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील जैवविविधता अधोरेखित करते.

रोहन भाटे,
मानद वन्यजीव रक्षक.

# जमिनी वाचवण्यासाठी शेतकऱ्यांचा सामुदायिक आत्मदहनाचा इशारा

## एमआयडीसी प्रादेशिक कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दिले निवेदन

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील प्रस्तावित औद्योगिक वसाहतीसाठी (एमआयडीसी) लागणाऱ्या भुकंपादन प्रक्रियेतुन शेतकऱ्यांचे गट वगळावेत या मागणीसाठी तामलवाडी येथील संबंधित सर्व शेतकऱ्यांनी त्यांच्या जमीनी वाचवण्यासाठी औद्योगिक वसाहत प्रादेशिक कार्यालय लातूर, जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव व तहसील कार्यालय तुळजापूर याठिकाणी लेखी निवेदन देऊन संबंधित शेतकऱ्यांनी सामुदायिक आत्मदहनाचा इशारा दिला आहे.तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे प्रस्तावित एमआयडीसी साठी शेतकऱ्यांच्या वाहीक बागायती जमीनी संपादित करण्यात येणार होत्या. परंतु, प्रस्तावित एमआयडीसी संबंधित शेतकऱ्यांनी जमीनी देण्यास ठामपणे विरोध दर्शविला व वाहीक बागायती जमीनी संपादित करू देणार नाही असा पवित्रा घेतला. दि २७ जानेवारी २०२५ रोजी संबंधित भुसंपादनास विरोध दर्शविणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष मोजणीसाठी आलेल्या संबंधित अधिकारी यांना शेतकऱ्यांच्या जमीनी मोजण्यास विरोध दर्शवला व शेतकऱ्यांच्या वाहीक, बागायती जमीनींची मोजणी करु नये असे सांगितले व जमीनीची मोजणी करण्यास आलेल्या संबंधित अधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या जमीनींची मोजणी केली नाही.जमींनींची मोजणी केली नाही तसे प्रत्यक्ष स्थळी पंचनामे केले



व त्याच्या प्रतिही शेतकऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमीनीचे गट नंबर संपादन प्रक्रियेतुन वगळावेत अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

दि.०६ जुन २०२५ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील भुसंपादन विषयक तरतूदी/प्रक्रिया द्वारे तामलवाडी ता तुळजापूर येथील १४६.७२ हेक्टर आर क्षेत्र पास थ्रो पध्दतीने औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता जमीनी घेण्यासाठी इच्छुक उद्योजकांकडुन प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यामध्ये संबंधित सर्व शेतकऱ्यांच्या गटांचा समावेश आहे. त्यामुळे संबंधित प्रस्तावित क्षेत्रामधुन जमीनीचे मोजणी न झालेल्या संबंधित शेतकऱ्यांचे गट नं दि .०७ जुलै पर्यंत वगळावेत अन्यथा दि.०८ जुलै रोजी संबंधित सर्व शेतकरी ग्रामपंचायत कार्यालय तामलवाडी येथे सकाळी ११ वाजता सामुदायिक आत्मदहन करणार अशा आशयाचे लेखी निवेदन शेतकऱ्यांच्या वतीने दि २४ जुन रोजी एमआयडीसी प्रादेशिक कार्यालय लातूर, जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव, तहसील कार्यालय तुळजापूर यांच्याकडे देण्यात आल आहे. ३० ते ३५ शेतकरी त्यांच्या वाहीक बागायती जमीनी वाचवण्यासाठी सामुहिक आत्मदहन करणार असल्याने तुळजापूर तालुक्यात एकच खळबळ उडाली असुन प्रशासनाच्या वतीने एमआयडीसी भुसंपादन प्रक्रियेतुन शेतकऱ्यांचे गट नंबर वगळणार का? शेतकरी सामूहिक आत्मदहन करणार ? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# धाराशिवमध्ये पशु-रोग निदान शिबिरांचे आयोजन

आरंभ मराठी | धाराशिव

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद धाराशिव यांच्या वतीने २५ जून ते १८ जुलै २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात पशु-रोग निदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये पशुपालकांना कृत्रिम रेतन, गर्भधारण तपासणी,वंधत्व तपासणी, लसीकरण आणि जंतनाशक उपचार आदी विविध सेवा शासनाच्या निर्धारित शुल्कानुसार उपलब्ध करून दिल्या जातील.या उपक्रमाचा अधिकाधिक पशुपालकांनी लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.


# राज्यातील वीज ग्राहकांना सरसकट दिलासा

## घरगुती ग्राहकांसोबत औद्योगिक आणि व्यावसायिक वीजदरात कपात

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीजदर ठरविण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निर्णय दिला असून घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे.राज्याच्या इतिहासात प्रथमच वीजदरात कपातीचा प्रस्ताव महावितरणकडून सादर झाला आणि आयोगाने आगामी पाचही वर्षात वीजदर कमी करण्याचा आदेश दिला. स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये आहेत. राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू केल्यामुळे साडेसात एचपीपर्यंतचे पंप असलेल्या राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे. वीजदर कमी करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही महत्त्वाकांक्षी योजना उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांना कृषी



पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी अंमलात येणाऱ्या या योजनेत विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जेद्वारे वीज तयार करून त्यावर पंप चालविण्यात येणार आहेत. या योजनेची क्षमता सोळा हजार मेगावॅट इतकी असेल व त्या माध्यमातून सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या कमी दराने वीज उपलब्ध होणार आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत योजना पूर्ण होणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना दिलासा देतानाच महावितरणच्या वीजखरेदी खर्चात कपात करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरली आहे.महावितरणने नजिकच्या भविष्यातील विजेची गरज ध्यानात घेऊन रिसोर्स ॲडेक्वसी प्लॅन तयार केला असून त्यानुसार २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीजखरेदी करार केले आहेत. त्यापैकी ३१ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांमधून मिळणार आहे. ही वीज अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्याने आगामी पाच वर्षात महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. त्यामुळे महावितरणला वीजदर कपातीचा प्रस्ताव मांडता आला आणि आयोगानेही त्यानुसार आदेश दिला.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या याचिकेनुसार प्रथमच वीजदर कपातीचा आदेश दिला आहे. वीजदर कपातीमुळे घरगुती ग्राहकांना दिलासा मिळतानाच उद्योग व्यवसायांना चालना मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वसामान्य घरगुती ग्राहकांच्या वीजदरात कपात करण्याचे आश्वासन दिले होते व त्याचे पालन झाले आहे. दरवर्षी औद्योगिक व व्यावसायिक वीजदरात दहा टक्के वाढ होत होती. त्याऐवजी आता पुढील पाच वर्षात या घटकांच्या वीजदरात कपात होणार आहे. मा. पंतप्रधानांच्या स्वप्नाला अनुसरून मा. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात राज्याला एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याला वीजदर कपातीमुळे महत्त्वाचे योगदान मिळणार आहे. ग्राहकांना किफायतशीर दरात दर्जेदार वीज पुरवठा करण्यास महावितरण वचनबद्ध आहे, असे महावितरणचे लोकेशचंद्र यांनी म्हटले आहे.

# श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ डी फार्मसी कॉलेजचे यश



विशाल डोंगरे 76.10%



दिनेश मणियार 75.10%



सानिया शेख 73.90%



सायली शिंदे 86.09 %



संध्या टेकाळे 77.91%



इनशा पटेल 72.82%

आरंभ मराठी | धाराशिव

डॉ.व्ही. पी. एज्युकेशनल कॅम्पस,छत्रपती संभाजी नगर रोड, धाराशिव येथील श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ संचलित कॉलेज ऑफ डी फार्मसीने प्रथम व द्वितीय वर्षामध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने डी फार्मसी च्या उन्हाळी परीक्षा मे २०२५ मध्ये घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये डी फार्मसी प्रथम वर्षातून प्रथम क्रमांक विशाल डोंगरे ७६. १०%,द्वितीय क्रमांक दिनेश माणियार ७५.१०% , तृतीय क्रमांक सानिया शेख ७३.९०% तसेच द्वितीय वर्षातून प्रथम क्रमांक सायली शिंदे ८६.०९%, द्वितीय क्रमांक संध्या टेकाळे ७७.९१% तर तृतीय क्रमांक इन्सा पटेल ७२.८२% गुण मिळवून यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील,संस्थेचे मार्गदर्शक करण प्रतापसिंह पाटील तसेच प्राचार्य डॉ.सूरज ननवरे, प्रा.सतीश केदार, प्रा.निखिल शेरखाने, प्रा.राणी मुंडे,प्रा .ऐश्वर्या सांगडे, प्रा.संजना जाधव यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# जागोजागी मृत्यूचे सापळे; उघडे डीपी बॉक्स, केबल वायर नागरिकांच्या जीवावर उठणार

## महावितरणचे अक्षम्य दुर्लक्ष; दुरुस्ती करा, नागरिकांची मागणी





विक्रांत उंदरे | आरंभ मराठी

वाशी –वाशी शहरातील अनेक भागातील विद्युत पुरवठा करणाऱ्या ट्रांस्फर्मरच्या डीपि बॉक्सची अत्यंत दुरवस्था झाली आहे. डीपीला वेलींचा आणि झाडा झुडपांचा वेडा पडला आहे तर डीपी बॉक्समध्ये फ्यूजचा पत्ताच नाही. तर काही डिपींचे उच्च विद्युत दाबाचे केबल चिरलेले असून केबल उघडे पडले आहेत. शहरातील डीपी जणू मृत्युचा सापळा असल्यासारख्या धोकादायक स्थितीत आहेत. याकडे महावितरनचे सपशेल दुर्लक्ष होत असून जीवितहानी झाल्यावरच दुरूस्ती करणार का ? असा प्रश्न नगरीकांतून विचारला जात आहे.

शहरातील खालची वेस, मारुती मंदिर, संभाजी महाराज चौक, रामनगर यासह विविध ठिकाणी अत्यंत रहदारीच्या भागात व मुख्य चौकात महावितरणचे डीपी आहेत. हे डीपी सताड उघडे असून यांना झाडाझुडपानी विळखा घातला असून त्यांना दरवाजेच नाहीत. त्यामुळे वादळी वाऱ्यात आणि पावसात शॉर्ट सर्किट होणे नित्याचेच बनले आहे. तर काही ठिकाणी सांडपाणी वाहणाऱ्या नाल्यांच्या शेजारी असलेल्या डिपींचे उच्च दाबाचे केबल उघडे आहे. परिणामी त्याचा विद्युत प्रवाह पाण्यात उतरून अपघात होण्याची शक्यता नाकारत येत नाही. काही ठिकाणी तर घराच्या शेजारीच उघडे डीपी बॉक्स असल्यामुळे त्याचाही धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे जीवितहानी झाल्यावरच दुरूस्ती करणार का ? असा प्रश्न नागरिकांतून विचारला जात असून लवकरात लवकर दुरूस्तीची मागणी केली जात आहे.

### कर्मचारी टाकत नाही फ्यूज

डायरेक्ट कनेक्शन, फ्यूज नसणे, उघडे केबल, झाडाझुडपांच्या विळख्यातील डीपी यामुळे जीवितास धोका होण्याच्या भीतीने पाऊस ,वारे, रात्री च्या वेळी फ्यूज गेल्यावर महावितरण च्या कर्मचाऱ्याकडून फ्यूजच टाकले जात नाही. परिणामी नागरिकांना अंधारातच रात्र काढावी लागते. त्यामुळे डिपींच्या दुरावस्था सुधाराव्यात आणि महावितरण च्या कर्मचाऱ्यांना सुरळीत विद्युत पुरवठा करण्याच्या सूचना द्याव्यात अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

### उघड्या केबलचा नागरिकांच्या जीवितास धोका

शाळा सुरू झाल्या असून लहान विद्यार्थ्यांची रस्त्यावरील रहदारी वाढली आहे. शाळेत ये–जा करताना लहान मुले रस्त्याच्या कडेने चालतात. तसेच रस्त्याच्या बाजूने चालणारे वाटसरु यांना रस्त्याच्या कडेवरील डीपीच्या उघड्या केबलचा स्पर्श होऊन जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. पावसामुळे वाढलेल्या गवताचा आणि झाडाझुडपंचा विळखा पडल्याने फिरस्ती जनावरे ते खाण्यासाठी येऊन त्यांनाही उच्च दाब असलेल्या उघड्या विद्युत केबलचा स्पर्श होऊन जीवितास धोका होऊ शकतो.

### डीपी बॉक्समध्ये ‘नो फ्यूज ; डायरेक्ट कनेक्शन

शहरातील बहुतांशी भागातील डिपींच्या बॉक्स मध्ये फ्यूजच नाहीत. डिपी बॉक्समध्ये मुख्य केबल वायरलाच थेट विद्युत तारांचा पिळा मारून जोडण्यात आले आहेत. विद्युत तारांचाच फ्यूज म्हणून वापर केला जात असल्याने फ्यूज गेल्यावर तो टाकताना विद्युत कर्मचाऱ्यांसाह सामान्य नागरिकांच्याही जीवितास धोका निर्माण झाला आहे.

### महिनाभरात दुरूस्ती होईल

महावितरणने डीपी बॉक्स , केबल दुरुस्तीचे काम संबधितांना दिले आहे. महिनाभरात सर्व ठिकाणची दुरूस्तीची कामे होतील. तसेच इतर मेंटेनन्स ची कामे सुरू आहेत.

–पराग तुरकडे,
सहा. अभियंता, महावितरण.

# भारत विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा



आरंभ मराठी | उमरगा

भारत शिक्षण संस्था संचलित भारत विद्यालय, बेडगा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक आर. एल. चौहान होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलेले पालक विजय कुमार गावडे, बाळू कुंभार, इंद्रजित कांबळे, यशवंत सोनकांबळे, राऊबाई देशमुख हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. कार्यक्रमाची सुरुवात डी. जी. माशाळकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी सत्काराचे औचित्य आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे महत्त्व स्पष्ट करत पालक व शिक्षकांचे योगदानही अधोरेखित केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी वाय. आर. माने यांनी अतिशय प्रभावीपणे पार पाडली. यावेळी सुरज कांबळे, नम्रता सोनकांबळे, अंकिता गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी बोलताना मुख्याध्यापक आर. एल. चौहान यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच मूल्यशिक्षण, शिस्त आणि ध्येय निश्चिती याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने उपस्थितांमध्ये नवी उमेद जागवली. कार्यक्रमास शाळेतील मुख्याध्यापक आर. एल. चौहान व शिक्षकवृंद डी. जी. माशाळकर, एस. ए. मानेगोपाळे, आर. सी. पवार, व्ही. बी. माने, वाय आर माने, के.एच. सुरवसे, के. आर. कांबळे, ए. एच. पवार, एम.एन.माने, जे. एच. कांबळे यांची उपस्थिती लाभली होती. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. हा सोहळा विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करत त्यांच्या प्रगतीच्या वाटचालीत नवचैतन्य निर्माण करणारा ठरला.

# बेडगा येथील भारत विद्यालयासाठी स्कुल बसची सोय

आरंभ मराठी | उमरगा




शिक्षण ही केवळ पुस्तकी ज्ञानाची प्रक्रिया नसून, ती जीवन घडणीची पायरी असते. ही पायरी चढताना विद्यार्थ्यांच्या वाटेतील अडथळे दूर करणे हे प्रत्येक सुजाण समाजप्रेमी नेतृत्वाचे कर्तव्य असते. उमरगा तालुक्यातील बेडगा येथील भारत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना शाळेला येण्या–जाण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. वाडीवस्त्यांवरून चालत येणाऱ्या विद्यार्थ्यांना उन्हा – पावसात, थंडीमध्ये सुरक्षितपणे शाळेत पोहोचणे ही एक मोठी समस्या बनली होती. त्यांच्या चेहऱ्यावरच तो थकवा आणि त्रास दिसत होता. विद्यार्थ्यांची हेळसांड दूर व्हावी, त्यांच्या शिक्षणाची वाट अधिक सुलभ व सुरक्षित व्हावी, या उदात्त हेतूने भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे आणि अश्लेष भैया मोरे व तसेच ज्येष्ठ संचालक भानुदासराव ( बापु ) माने यांनी पुढाकार घेतला. त्यांनी अत्यंत दूरदृष्टी आणि संवेदनशीलता दाखवत भारत विद्यालय, बेडगा येथे स्कूल बस भेट दिली. ही बस केवळ एक वाहन नसून, ती अनेक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची गती आहे. आज या बसमुळे कित्येक घरांतील पालक निर्धास्त झाले आहेत आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलले आहे. त्यांचा प्रवास आता केवळ शाळेकडे नव्हे, तर उज्वल भविष्याकडे सुरू झाला आहे.

# राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने विशेष मोहीम

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे समितीकडून आवाहन

आरंभ मराठी | पळसप

राजर्षी शाहू महाराज जयंती पर्व निमित्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयाच्या वतीने विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले आहे. दिनांक २६ जून २०२६ ते ४ जुलै २०२५ या कालावधीत हे नियोजन करण्यात आले आहे. या विशेष मोहिमे अंतर्गत ११ वी आणि १२ वी विज्ञान शाखेतील तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम २०२६–२७ मधील सर्व प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमे दरम्यान विज्ञान शाखेतील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जात पडताळणी प्रकरणे तालुका व महाविद्यालय निहाय संख्यात्मक माहिती समान संधी केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालय तसेच जिल्हास्तरावर संकलित करण्यात येणार आहेत. समता पंधरवड्यात सीईटी देणारे विद्यार्थी, डिप्लोमा, तृतीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज देखील भरण्यात येऊन अर्ज भरताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी संबंधित महाविद्यालयातील समता संधी केंद्रामार्फत वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे .समान संधी केंद्राच्या माध्यमातून सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज जमा करण्यात येणार असून प्राप्त अर्जावर तात्काळ कार्यवाही करून वैधता प्रमाणपत्र देण्याचे नियोजन जात पडताळणी समितीच्या वतीने करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी सिईटी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयामार्फत परिपूर्ण अर्ज सादर करून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी जात पडताळणी समिती कार्यालय धाराशिव येथे परिपूर्ण अर्ज सादर करून या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा. असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती धाराशिव यांच्याकडून करण्यात येत आहे.

# मेंढा येथे सूर्यनमस्काराने जागतिक योग दिन साजरा

आरंभ मराठी | तेर




धाराशिव तालुक्यातील मेंढा येथे २१ जून रोजी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने अंगणवाडी क्रमांक ४१९ व ४२० येथे जागतिक योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यात सूर्यनमस्कार, लोम अनुलोम ,कपालभाती ,प्राणायाम, शिवासन, पवन मुक्त आसन इत्यादी प्राणायाम अंगणवाडी येथे घेण्यात आले. यावेळी अंगणवाडी सेविका मुमताज बेग बबीता शेटे अंगणवाडी मदतनीस गावातील महिला उपस्थित होत्या.

# कैलास पाटील यांच्याकडून आमदार वेतनातून मदत

आरंभ मराठी | धाराशिव



अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या मराठवाडा विभागीय कार्यालयासाठीआमदारकैलास पाटील यांनी त्यांच्या आमदार वेतनातून ४० हजारांची मदत दिली आहे. यासंदर्भातील धनादेश अण्णासाहेब पाटील फाऊंडेशनला देण्यात आला. आर्थिक विकास महामंडळाचे मराठवाड्याचे विभागीय कार्यालय बीडमध्ये सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या खर्चासाठी म्हणून आमदार कैलास पाटील यांनी आपल्या आमदार वेतनातून ४० हजार रुपयांचा धनादेश फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष खंडू राऊत यांच्याकडे सुपूर्द केला. त्यांच्या या मदतीबद्दल फाउंडेशनच्या वतीने आभार मानण्यात आले.

# कायमस्वरूपी रोजगार,नोकरभरतीत आरक्षण द्या

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थ्यांची मागणी

आरंभ मराठी | उमरगा





मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविणाऱ्या महाराष्ट्र शासनाकडे विविध मागण्यांसाठी प्रशिक्षणार्थी युवक–युवतींनी निवेदन सादर केले आहे. हे निवेदन आमदार प्रवीण स्वामी, माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले आणि तहसीलदार गोविंद येरमे यांच्याकडे देण्यात आले. निवेदनात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरूपी रोजगार देण्यात यावा, सरकारी नोकर भरतीत १० टक्के आरक्षण लागू करण्यात यावे, तसेच प्रशिक्षणार्थ्यांचे मानधन वाढवून ते दर महिन्याच्या १ तारखेला नियमितपणे जमा करण्यात यावे अशी प्रमुख मागणी करण्यात आली. प्रशिक्षणाच्या मुदतीनंतर अनेक आस्थापनांमध्ये फेरनिवड न झाल्याचे, तसेच फेरनिवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना आजपर्यंत मानधन न मिळाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आमदार प्रवीण स्वामी यांनी या मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत, मी हा मुद्दा विधानसभेत मांडून सरकारकडे ठोस पाठपुरावा करेन, असे आश्वासन दिले. त्यांनी योजनेच्या माध्यमातून अनेक तरुणांना प्रशिक्षण मिळाले असले तरी, कायमस्वरूपी रोजगाराच्या अभावामुळे ही तरुणाई आजही अनिश्चिततेत आहे, याकडे लक्ष वेधले. माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी सांगितले की, या प्रश्नावर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार करून प्रशिक्षणार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे.प्रशिक्षणार्थ्यांनी सांगितले की, आम्ही ११ महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले असून, आता आमच्या भवितव्यासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावा. नोकरीची कोणतीही हमी नसल्याने आम्ही पुन्हा बेरोजगार होण्याच्या भीतीत आहोत. सरकारने आमच्यावर न्याय करावा,'' अशी भावना व्यक्त केली. या निवेदन प्रसंगी सुरज आबाचने, राम सुरवसे, अनिकेत औरादे, चेतन गायकवाड, राम कांबळे, नितीन जाधव, मोहसीन मुंगले, प्रदीप साळुंके, गोपाळ बलसूरे, राजश्री ऐकळे, जयश्री कोळी, अमृत मोरे, भाग्यश्री सुतार, सुनिल पाटील, क्रांती शिताळे, ऋषीकेश बिराजदार, आनंद तळबुगे, दत्ता इंगळे आदींसह प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरकारकडून लवकरात लवकर ठोस निर्णय घेतला जाईल, अशी अपेक्षा या आंदोलनातून व्यक्त होत आहे.

# शिंगोली येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव तालुक्यातील शिंगोली येथे हरिभाऊ घोगरे हायस्कूल उपळे (मा.) प्रशालेत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ शिंगोली ग्रामपंचायतमध्ये करण्यात आला. गावच्या प्रथम नागरिक (सरपंच) सौ. योगितातार्इ राहुल शिंदे, उपसरपंच ॲड. श्री. मनोज मगर, माजी सरपंच येडबा शितोळे, ग्रामपंचायत सदस्य गणपत मगर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिंगोली गावच्या सरपंच सौ. योगितातार्इ राहूल शिंदे या होत्या तर प्रमुख पाहुणे माजी सरपंच येडबा शितोळे होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक कांबळे टी. डी. यांनी केले सूत्रसंचालन क्षीरसागर ए. बी. यांनी केले आभार श्रीमती घोगरे बी. ए. मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चौधरी जी. बी. व प्रशालेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.